# माध्यमांची व्याप्ती, प्रभाव वाढता

## श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयात कार्यशाळा

महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर

**म. टा. प्रतिनिधी,** नागपूर

माध्यमांची व्याप्ती आणि प्रभाव सातत्याने वाढत आहे. कोणत्या ना कोणत्या प्रकारे प्रत्येकाचा माध्यमांशी संबंध येत आहे. त्यामुळे, सगळ्यांनीच माध्यमांच्या बदलत्या स्वरुपाविषयी आणि माध्यमांच्या जगाविषयी माहिती करून घ्यायला हवी, असे आवाहन विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना 'माध्यम संबंध' या विषयावरील विशेष अभ्यासक्रमात करण्यात आले. नागपूर शिक्षण मंडळाचे श्रीमती बिंझाणी महाविद्यालयाच्यावतीने आणि इंद्रधनू क्लस्टरच्या साहाय्याने 'माध्यम संबंध' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी १० ते १४ ऑगस्टदरम्यान आयोजित या ऑनलाइन कार्यक्रमाचे 'महाराष्ट्र टाइम्स' माध्यम प्रायोजक होते.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना माध्यमांचे स्वरूप, माध्यमांसाठीचे लिखाण, माध्यमांशी संबंध, बातमीचे लिखाण, जनसंपर्क इत्यादी बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय बदलत्या गतिमान काळात माध्यमांनी अंगिकारलेले स्वरूप, तंत्रज्ञानामुळे झालेले बदल, विविध कार्यक्रमांचे आयोजन इत्यादी विषयांवर इत्थंभूत माहिती देण्यात आली. माध्यमतज्ज्ञ डॉ. अजय गिडवाणी यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ऑनलाइन समारोप कार्यक्रमाला नागपूर शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. हरीश राठी, अभ्यासक्रम मार्गदर्शक डॉ. गिडवाणी, कॉलेजच्या आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुचिता मराठे, कार्यशाळा समन्वयक डॉ. चारुता जोशी प्रामुख्याने उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले आणि माध्यमांशी संबंधित या कार्यशाळेच्या उपयुक्ततेची मांडणी केली. कार्यशाळेत सहभागी विद्यार्थिनींनी आपले अनुभव यावेळी मांडले. डॉ. चारुता जोशी यांनी कार्यक्रमाचे संचालन केले आणि आभार मानले. या कार्यशाळेत नागपूरसह इतर शहरे आणि राज्यातूनही विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.